# मुकुल माधव फाऊंडेशन यांच्या पुढाकाराने २२ मुलांवर यशस्वी हृदय शस्त्रक्रिया

मुंबई । प्रतिनिधी

फिनोलेक्स इंडस्ट्रिजचे सीएसआर पार्टनर असलेल्या, मुकुल माधव फाऊंडेशनच्या पुढाकाराने, ४ महिने ते २० वर्षेया वयोगटातील एकूण २२ लहान मुलांवर हृदय शस्त्रक्रिया करण्यात येणार आहे. या अविश्वसनीय उपक्रमामध्ये हिलिंग लिटल हार्टस, यु.के. व रुबी हॉल क्लिनिक, पुणे या दोन संस्थांचा देखील समावेश आहे.

समाजातील तळागाळातील लोकांना याचा लाभ मिळावा व आरोग्याबाबत निर्माण झालेली दरी भरून काढण्याच्या उद्देशाने या पुढाकाराचा उगम झाला. दरवर्षी ३ महिन्यातून एकदा युके वरून ६ विशेषतज्ञांचे पथक रुबी हॉलमधील मुलांवर हृदय शस्त्रक्रिया करण्यासाठी तसेच शस्त्रक्रियेनंतर घेण्याच्या काळजीबाबत मार्गदर्शन करण्यासाठी भेट देतात.

रुबी हॉल क्लिनिक शस्त्रक्रियेसाठी पायाभूत सुविधा उपलब्ध करून देण्याबरोबरच अशा मुलांची छाननी करण्यासदेखील मदत करतात. जवळपास ५०% शस्त्रक्रिया या २०% ते ८०% अशा सवलतीच्या दरात केल्या जातात. हा उपक्रम २०१४ ला सुरू झाल्यापासून सुमारे ६८ मुलांना याचा लाभ घेता आला.

मुकुल माधव फाऊंडेशनच्या व्यवस्थापकीय विश्वस्त, सौ. रितू छाब्रिया म्हणतात की, भारतामध्ये उत्तम शस्त्रक्रिया करणारे, खरं तर रुबी हॉल क्लिनिकमधील डॉ. मनोज दुराईराज, तसेच केरळमधील डॉ. स्मार्टिन अब्राहम जे यावेळी या शस्त्रक्रिया करणार आहेत, यांसारखे डॉक्टर्स उपलब्ध आहेत.